**महाराष्ट्र शासन**

क्रमांक. संकीर्ण २०२१/प्र.क्र.९६५/आस्था-१४
ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन,
२५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ०१
दिनांक : १४ जानेवारी, २०२२.

प्रति

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

**विषय** : महानगरपालिका / नगरपालिकेतून प्राथमिक शिक्षकांना जिल्हा परिषदेमध्ये आंतरजिल्हा बदली (सेवा वर्ग करुन) देण्याबाबतचा शासन निर्णय स्थगित करणे बाबत.

नगरविकास विभागाच्या दिनांक १६.०२.२०२१ च्या शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे. कृपया अवलोकन व्हावे.

२. राज्यातील विविध जिल्हा परिषदांमध्ये कार्यरत असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांना त्यांच्या स्वजिल्ह्यात आंतरजिल्हा बदली देण्याबाबत ग्रामविकास विभागाने वेळोवेळी धोरण निश्चित करण्यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित केलेले आहेत. सन २०१७ पासून जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्यांकरिता ऑनलाईन प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या आंतरजिल्हा बदल्यांच्या कार्यवाहीमध्ये बरेच प्राथमिक शिक्षक त्यांच्या स्वजिल्ह्यात बदलीने जाण्याकरिता विविध कारणास्तव प्रतिक्षेत आहेत.

३. नगरविकास विभागाने नागरी / ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्राथमिक शिक्षकांच्या अंतर्गत बदली / सेवा वर्ग करण्याबाबत दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाने धोरण निश्चित केले आहे. सदर धोरणामध्ये महानगर पालिका / नगरपालिका / नगरपंचायतीमधील प्राथमिक शिक्षकांस जिल्हा परिषदेमध्ये बदली हवी असल्यास संबंधित आयुक्त , महानगरपालिका / मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपंचायत यांची व संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची मान्यता आवश्यक करण्यात आलेली आहे. सदर धोरणानुसार नगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक शिक्षकांना संबंधितांकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर ऑफलाईन बदल्या होऊ शकतात. जिल्हा परिषदांतर्गत होणाऱ्या आंतरजिल्हा बदली प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात प्राथमिक शिक्षक बदलीकरिता प्रतिक्षेत आहेत . या स्थितीत महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायती मधील प्राथमिक शिक्षकांना संबंधित जिल्हा परिषदेकडील बदलीकरिता ऑफलाईन ना-हरकत / मान्यता दिल्यास जिल्हा परिषदेतील प्रतिक्षा यादीतील शिक्षकांवर अन्याय

होईल. सदर महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायतीमधील प्राथमिक शिक्षकांना ऑनलाईन प्रक्रियेमध्ये घेणे आवश्यक आहे. सबब, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी पुढील आदेश होईपर्यंत अशाप्रकरणी ऑफलाईन पध्दतीने ना-हरकत प्रमाणपत्र देऊ नये.

**सोबत :- वरिलप्रमाणे.**

**(सुनिल हंजे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१) विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व).

२) श्री.आयुष प्रसाद, (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे तथा अध्यक्ष, जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक बदल्या अभ्यासगट.

त्यांना विनंती करण्यात येते की , ऑनलाईन बदल्यांकरिता सुरु करण्यात येणाऱ्या नवीन संगणक प्रणालीमध्ये महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायतीमधील प्राथमिक शिक्षकांना सोयी उपलब्ध करुन देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.